ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

विकासास हातभार लावण्याची क्षमता कौशल्ये अंगिकारली पाहिजे. शिक्षकाची भूमिका ही राष्ट्रनिर्माण करण्यामध्ये महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी कुटुंबाप्रमाणेच शाळेची, समाजाची आहे. व्यक्तिमत्वाची जडणघडण, जीवन कौशल्ये, स्वावलंबन, शिस्त, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण मुल्ये, वैज्ञानिक मूल्य यासारखे अनेक संस्कार अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यावर रुजवले जातात. त्यामध्ये शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण आहे. आज जागतिकीकरणामध्ये लोकल टू ग्लोबल मूल्याची कास धरणे गरजेचे आहे. त्याचा समावेश शिक्षणात असणे आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय विकासाबरोबरच आंतरराष्ट्रीय मुल्ये घडविण्याचे व रुजविण्याचे कार्य शिक्षकास करावे लागते. यासाठी शिक्षक शिक्षणातून निर्माण होणारे शिक्षक शाश्वत विकास घडवून आणण्यास योगदान देवू शकतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- शाश्वत विकास संकल्पना स्पष्ट करणे.
- शाश्वत विकासात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करणे.

**शाश्वत विकास संकल्पना :**

शाश्वत विकासाची संकल्पना प्रथमता १९८७ मध्ये बर्टलँड आयोगाने मांडलेली आहे. बर्टलॅंड आयोगाच्या मते शाश्वत विकासातून वर्तमानकालीन पिढीच्या गरजाची पूर्तता करण्याबरोबरच भविष्यातील येणाऱ्या पिढ्यांच्या गरजा भागविण्यासाठी या क्षमता अबाधित ठेवून साधलेला विकास म्हणजे शाश्वत विकास होय. भावी पिढीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वर्तमान विकासामध्ये तडजोड न करणे. नैसर्गिक संसाधन वापर करताना मर्यादित वापर करून येणाऱ्या पिढ्यांना उपलब्ध करून देणे. शाश्वत विकासाची संकल्पनेच्या सविस्तरपणे १९८२ च्या रिओ दे जानेरोच्या परीषदमध्ये सर्वांगीणपणे विचार केला आहे. शिक्षणाचे उन्नयन व सुधारणा, शाश्वत विकासासाठी सर्व स्तरावरील शिक्षणाची पुनर्रचना, जनसामान्यामध्ये जाणीव जागृती सोबत सामंजस्याचा विकास आणि प्रशिक्षण या चार बाबीवर भर देण्यात आला आहे. युनोच्या सप्टेंबर २०१५ मध्ये संपन्न झालेल्या या परिषदेने २०३० पर्यंत शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे निश्चित केले आहे. यावर सर्व जगातील १९९२ राष्ट्रांनी स्वाक्षरी केली आहे.

**शाश्वत विकास अर्थ :**

शाश्वत विकासास Sustainable Development असेही म्हणतात. शाश्वत विकास म्हणजे एक अशी प्रक्रीया आहे विकास साधत असतांना वर्तमानकालीन पिढीच्या गरजा पुर्ण करतांना भविष्यकालीन पिढीच्या नैसर्गिक संशोधनामध्ये अडथळा निर्माण न करणे होय. तसेच वर्तमान व भविष्यकालीन पिढीसाठी नैसर्गिक संसाधनाचा क्षमतेनूसार उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे होय.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

थोडक्यात शाश्वत विकास म्हणजे मनुष्याने विकास करतांना निसर्गाचा अशाप्रकारे वापर व उपयोग केला पाहीजे की ज्याद्वारे पर्यावरणाला हानी पोहोचू नये आणि निसर्ग आणि विकासामध्ये संतूलन राखले पाहीजे त्यातूनच शाश्वत विकास होईल.

**शाश्वत विकासातील पाच पी** :

शाश्वत विकास २०२३ पर्यंत साध्या करण्यासाठी SGD ने १७ उद्दिष्टे निर्धारित केली आहेत. प्रामुख्याने या मध्ये पाच पी आहेत. People, Plannet, Pers Prosperity, Peace and Partership या मुख्य बाबीवर भर देण्यात आला आहे. २०३० पर्यंत शाश्वत विकासाची निर्धारित केलेली उद्दिष्टे साध्य करावयाची आहे. SGD4 च्या उद्दिष्टानुरूप विद्यार्थ्यासाठी दर्जेदार आणि सुलभ शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे आहे. या दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांसाठी सुरक्षित, समावेशक व प्रभावी शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक सुख सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यकता आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा अभ्यास :**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आाला. (चित्ते कीर्ती,२०२३), शाश्वत विकासाच्या एकूण १७ उद्दिष्टामध्ये क्रमांक४ नूसार सर्व समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे. क्रमांक ५ नुसार लिंगभावधिष्ठीत समानता व महिला आणि मुलीचे सक्षमीकरण साधने यावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यात शिक्षक शिक्षणासाठी नेमलेल्या विविध आयोग व समित्यांची शिक्षक व शिक्षणातून उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत. NCTE राष्ट्रीय स्तरावर शिक्षक प्रशिक्षणाचा आराखडा तयार करतांना उद्दिष्टानुसार कार्यवाही होण्यावर भर दिला आहे. १९६४-१९६६ कोठारी आयोगाने शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यमातून अध्यापकाचे शिक्षण हे शैक्षणिक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहामध्ये आणावयास हवे अशी शिफारश केली आडे. १९८३-१९८४ च्या चट्टोपाध्याय समितीने शिक्षकांच्या व्यावसायीकीकरणावर भर दिलेला आहे. (रवि जाधव) NEP २०२० ने देखील शिक्षक प्रशिक्षणातून विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

(NEP 2020),मध्ये ही शाश्वत विकास संकल्पनेचा अंतर्भाव केला आहे. भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासासाठीच्या २०३० च्या कृती कार्यक्रम SDGउद्दिष्ट क्र. ४ नुसार जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रमाचा समावेश केलेला आहे. यानुसार सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करून सर्वांसाठी निरंतर शिकण्याचा शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देण्यासाठीचे कटीबद्धता निर्धारित केली आहे. शाश्वत विकासाची संकल्पना अंमलात आणणेसाठी भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या शिक्षण प्रणालीमध्ये नव्याने रचना करण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होणार आहे.

(रवी जाधव, गौतम गायकवाड २०१५),२१ व्या शतकातील कौशल्याच्या आधारे विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शिक्षणातून घडविण्यासाठी शिक्षणाद्वारे शिक्षकाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आज शिक्षणामध्ये विविध नवविचार व

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

परीवर्तन झालेले आहेत. त्यात निरंतर शिक्षण, शाश्वत विकास, दूरस्थ शिक्षण, इ अध्ययन, माहिती संप्रेषण, वंचितांचे शिक्षण, भविष्यकालीन शिक्षण, पर्यावरणीय शिक्षण, शांतता शिक्षण इत्यादी आहेत.या सर्व घटकामध्ये शिक्षकाचे स्थान महत्वपूर्ण आहे. शिक्षक शिक्षणातून तयार होणाऱ्या शिक्षकामध्ये सर्व गुण असावेत. अशा सर्वगुणसंपन्न असलेल्या शिक्षक विद्यार्थ्यामध्ये मुल्ये, नैतीक मुल्ये, जीवन कौशल्ये, मनाचा विकास, मानसिक विकास घडवून आणल्यास योगदान देत असतो. शिक्षक विद्यार्थ्यामध्ये शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी कार्य करीत असतो. शाश्वत विकासाची जबाबदारी शिक्षणापासून शालेय स्तरावर साध्य करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण आहे. SDG नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकावर आहे. औपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून समानता निर्माण करणे आवश्यक आहे

**प्रस्तुत संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विषय शाश्वत विकासातील शिक्षकाची भूमिकाचा अभ्यास या विषयावरील आहे. प्रस्तुत संशोधन समस्या ही वर्तमानकालीन निगडीत संशोधन समस्या आहे. त्यामुळे सदर संशोधनासाठी वर्तमानकालीन संशोधन पद्धतीतील आशय विश्लेषण या पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

**शाश्वत विकास व शिक्षक:**

शिक्षण म्हणजे वर्तनामध्ये बदल करणे होय. शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये संस्कार, वर्तन, कौशल्ये, रुजविल्या जातात. या सर्व बाबी तात्विक व प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षणातून शिकविल्या जातात. त्यामुळे व्यक्तीचा वाक्तिगत विकास होण्यास मदत होते. व्यक्तीचा व्यक्तिगत विकासावरच समाजाचा सुयोग्य सर्वांगीण विकास अवलंबून असतो. पुढे सामाजिक विकासाबरोबरच राष्ट्राचा विकास होण्यास हातभार लागतो. त्यामुळे व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठीची शिक्षणाने भूमिका साध्य केली तर शाश्वत विकास होण्यास मदत होते. ज्योती मिश्रा (२०१७) च्या मते शिक्षक शिक्षण आणि शाश्वत विकास भारतीय परिस्थितीमध्ये मांडतांना शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. ज्ञान निर्मिती, सामाजिक स्वास्थ, स्वालंबन, लिंग समानता, लोकशाही दृढीकरणासाठी शाश्वत विकास महत्वपूर्ण असल्याचे मांडले आहे.

थोडक्यात शिक्षक हा व्यावसायिक विकास करण्यासोबतच व्यक्तिमत्व विकास, चिंतन, मनन, नेतृत्व, चिकित्सक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन, जबाबदारीची जाणीव, उत्तरदायित्व, आधुनिक अध्यापनाच्या पद्धतीचा पुरस्कार करणारा, सहकार्यशील, विषयावर प्रभुत्व असलेला तसेच आंतरशाखीय दृष्टीकोन स्वीकारणारा हवा आहे. विद्यार्थ्यामध्ये अध्ययन अध्यापनातून जिज्ञासा वृत्तीस चालना देणारा, शोधक वृत्ती विकसित करणारा, आव्हानांना पेलण्यास संदर्भ बनविणारा असे विविध गुणकौशल्ये असणारा हवा आहे. त्यांच्या हातूनच विद्यार्थी घडतील. त्यामुळे राष्ट्राला अपेक्षित असणारा शाश्वत विकास होण्यास हातभार लागेल.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

**शाश्वत विकासातील शिक्षकांची भूमिका :**

- **शाश्वत विकास साधताना अभ्यासक्रमातून योगदान :**
  शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यावर विविध संस्कार मूल्ये रुजवले जातात. शिक्षणाद्वारे विविध विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये ज्ञानात्मक भावात्मक क्रियात्मक विकास,वृत्ती अभिवृत्ती, दृष्टिकोन विकसित होण्यावर भर दिला जातो. ज्यातून विद्यार्थ्यांचा विकास होतो. परंतु विद्यार्थ्यांचा होणारा विकास हा राष्ट्रासाठी उपयूक्त ठरावा. अशा विद्यार्थ्याकडून नैसर्गिक संसाधनाचा वापर करतांना त्याचे महत्व समजले पाहीजे.विकास साधता असताना नैसर्गिक संसाधनाचा मर्यादित वापर करण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्याकडून तशी कृती होणे आवश्यक आहे. त्याकरीता शालेय अभ्यासक्रमात विविध बाबींचा समावेश केलेला असतो. लोकशाही मूल्य विकसित देखील केले जातात. या विविध उपक्रमासाठी अभ्यासक्रमाद्वारे शाश्वत विकासास हातभारास उपयूक्त होते.

- **शिक्षणाद्वारे अनुभवजन्य परिस्थितीतून शाश्वत विकास :** शाश्वत विकास राबविण्यासाठी शिक्षकाची भूमिका शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणातून विवध बाबी परिस्थितीजन्य अनुभव प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून देण्याची व्यवस्था केली जाते. त्यातून विद्यार्थ्याचा विकास होण्यास मदत होते. शाश्वत विकास ही संकल्पना केवळ सांगून चालणार नाही तर त्यासाठी विविध उपक्रम सामाजिक उपक्रम समाजसेवा ऊर्जा बचत विषयाची उपक्रम पाणी वापर बाबतचे उपक्रम निसर्ग संसाधनाचा वापर टाकाऊ पासून टिकाऊ या बाबतची विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये अनुभव ज्यांनी ज्ञान देऊन शाश्वत विकास साधण्यास मदत करतात यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे

- **शालेय स्तरावरील शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबविणे :** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये अभ्यासक्रमाबरोबर विविध उपक्रम महत्त्वाचे ठरतात. शाश्वत विकासाची संकल्पना म्हणजे सर्व घटकांचा समतोलपणे विकास होय.शालेय स्तरावर विविध विषयातून शाश्वत विकासाबाबतचे उपक्रम अभ्यासपूर्वक कार्यक्रम समाजसेवा उपक्रम पर्यावरण विषयक उपक्रम राबविले जातात. पायाभूत विकास साधण्यासाठीचा शाश्वत विकास किती महत्त्वाचा आहे याबाबत ज्ञान उपक्रमातून विद्यार्थ्यांना दिले जाते. तसेच त्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रमाची आयोजन देखील केले जाते. उपक्रमाचे आयोजन करताना विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासासाठीची अंमलबजावणी कशी करावी याबाबतचे शिक्षकाची भूमिका व मार्गदर्शन त्यांना उपयोगी ठरते. त्यामुळे पर्यावरणास हातभार लागतो. शालेय स्तरावरील आयोजन होणारे छोटे छोटे उपक्रम देखील शाश्वत विकास करण्यास उपयुक्त ठरू शकतात. असे उपक्रमाचे आयोजन शालेय स्तरावर राबवून शाश्वत विकास करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची ठरते.

- **शाश्वत विकासासाठी विविध संस्थाशी सहयोग व सहकार्य :** शाश्वत विकास ही काही एका घटकाची किंवा संस्थाची जबाबदारी नाही. पृथ्वीवरील सर्व घटक मिळून पर्यावरणाचा समतोल राखला जातो. सृष्टीचे जीवनचक्र सुरळीतपणे चालण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे देखिल विविध संस्था, बाह्य घटक व संस्थांची एकत्रित भागीदारी व सहकार्याने शाश्व विकासासाठीचे विविध प्रकल्पाचे आयोजन करता येऊ शकते. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय शाश्वत विकासाविषयीचे मूल्य कौशल्य रुजवल्या जातात. त्यांच्यात अशा मूल्यातून कौशल्य क्षमता निर्माण होतात. कौशल्य व क्षमता चा वापर करून भविष्यकालीन शाश्वत विकास करण्याबाबतची संधी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. त्यातून शाश्वत विकासाद्वारे विद्यार्थी व समाजाचा विकास साधला जातो
- **विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव व उत्तरदायित्व विकसित करणे :** शालेय शिक्षणाद्वारे अभ्यासपूर्वक व अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत विकासाबाबत जबाबदारीची व उत्तरदायित्वाची भावना विकसित करता येऊ शकते. त्यासाठी शालेय शिक्षणाद्वारे पर्यावरणाचा समतोल साधण्यास मदत व योगदान देण्याची सवय विद्यार्थ्यांमधील लावतात येऊ शकते . पर्यावरण पाणी ऊर्जा याबाबत जबाबदारी व उत्तरदयित्वाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवत शिक्षक विद्यार्थ्यासमोर आदर्श घालून देतात. त्यामुळे त्यांच्यावर संस्कार व मूल्य रूजतात. पर्यावरणीय बदल व आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले जाते. परीस्थितीची जाणीव होते. त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास होतो. पर्यायाने भावी काळात शाश्वत विकासाची जबाबदारी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. व शाश्वत विकासात हातभार लागतो
- **शाश्वत विकासाबद्दल जागरूकता विकसित करणे :** आजच्या या काळामध्ये भौतिक सुखाच्या मागे जाताना पर्यावरणाचा शाश्वत विकास साधने अतिशय महत्त्वाचा आहे. नैसर्गिक संसाधनाचा वापर करताना कमीत कमी कसा केला जाईल व येणाऱ्या भावी पिढीसाठी नैसर्गिक संसाधन उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. या माध्यमातून या सर्व बाबीची जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केल्यास संपूर्ण मानव जातीचा कल्याण साधता येईल. येणाऱ्या पिढीसाठी नैसर्गिक संसाधने राखून ठेवल्या जातील. वर्तमानकालीन गरजांचा वापर व विनियोग करताना भविष्यकालीन गरजांचा देखील विचार करण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये लावणे आश्यक आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील मानवासमोर उभा उभ्या राहणाऱ्या पर्यावरण विषयक जलविषयक मृदाविषयक नैसर्गिक संसाधन विषयक ऊर्जा विषयक ज्या समस्या तयार होत आहेत त्या समस्या कमी करण्यासाठी शाश्वत विकास किती महत्त्वाचा आहे याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव व जागृती निर्माण होते. शाश्वत विकासाबाबतच्या संवेदना विद्यार्थ्यामध्ये निर्माण झाल्यास त्याचा निश्चित फायदा होणार आहे. शिक्षणातून या सर्व बाबीचे ज्ञान व अनुभव विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाद्वारे शालेय स्तरावर

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II    MARCH – APRIL 2024

Original Research Article

शिक्षकाद्वारे देता येवू शकते.

**निष्कर्ष:** शास्वत विकास ही काळाची गरज आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संकल्पनात्मक अभ्यासाअंती आशय विश्लेषण पध्दतीने विविध दस्ताएवज अभ्यासावरुन खालीलप्रमाणे निष्कर्ष आहेत.

- शाश्वत विकास संकल्पना स्पष्ट करणेसाठी शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दिसते.
- शाश्वत विकास संकल्पना साध्य करणेसाठी शिक्षकांना शालेय स्तरावर विविध उपक्रम आयोजन करावे लागते.
- शाश्वत विकास व शिक्षण या बाबी वेगळ्या करुन चालणान नाही तर विद्यार्थ्यामध्ये शाश्वत विकास रुजविणेसाठी शिक्षकाचे योगदान असल्याचे दिसते.

**समारोप :** शाश्वत विकासाची संकल्पना साध्य करणेसाठी शिक्षणाचे स्थान महत्वाचे आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये संस्कार, वर्तन, कौशल्ये, रुजविल्या जातात. या सर्व बाबी तात्विक व प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षणातून शिकविल्या जातात. त्यामुळे व्यक्तीचा वाक्तिगत विकास होण्यास मदत होते. व्यक्तीचा व्यक्तिगत विकासावरच समाजाचा सुयोग्य सर्वांगीण विकास अवलंबून असतो. पुढे सामाजिक विकासाबरोबरच राष्ट्राचा विकास होण्यास हातभार लागतो. त्यामुळे व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठीची शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे. शिक्षक शाश्वत विकासमध्ये योगदान दोवू शकतात. शिक्षण आणि शाश्वत विकास भारतीय परिस्थितीमध्ये मांडतांना शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :**

1. *Mishra Jyoti,(June 2027) International Journal for Innovative Research in Multidisciplinary field, Vol 3 ,Issues 6, Online wow,JIJIRMF.Com.*
2. *चित्ते कीर्ती,(२०२३) मराठी शाश्वत विकासासाठी शिक्षण, विश्वकोश शिक्षणशास्त्र.*
3. *जाधव रवी, गायकवाड गौतम (२०१५), शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद*
4. *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf*
5. *पाटील विनोद , दहीवेलकर विजयश्री , पाटील दिपक , (२०१३) शिक्षक आणि विकास , जळगाव , अथर्व पब्लिकेशन*

*Cite This Article:*

**डॉ. पवार द. दु. (2024).** *शाश्वत विकासातील शिक्षकांची भूमिका.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 192–198). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10907920